<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६२/२०२०</u>

( केशव शंकर बांदिवडेकर विरुध्द दिपिका दिगंबर पांचाळ व.८)

## <u>:– नि. २६ खालील आदेश –:</u>

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्र.वादी नं. ७ लक्ष्मी जगन्नाथ बांदिवडेकर या दिनांक ०८/१०/२०२३ रोजी मयत झालेल्या असून त्यांना ७अ. श्रीमती लता मनोहर परब पुर्वाश्रमीची सुमती जगन्नाथ बांदिवडेकर (मुलगी) हेच कायदेशीर वारस असून त्याचे व्यतिरिक्त वादी यांच्या माहितीप्रमाणे अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. तरी अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ७ च्या कायदेशीर वारसांना अभिलेखावर आणण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेऊन योग्य तो आदेश पारित करण्यात यावा असे कथन केले आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा, दावा मिळकतीमध्ये वादीचा १/४ हिस्सा आहे असा ठराव होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी आणि प्रतिवादी नं. ७ व ८ यांच्या पुर्वाधिका–यांनी, प्रतिवादी नं. १ ते ५ यांच्या पुर्वाधिका–यांना लिहून दिलेले खरेदीखत निम्म्या हिश्शापुरते रद्द होऊन मिळणेसाठी व तत्परिणामी कायमच्या ताकिदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. ७ या मयत झाल्याने तिचे कायदेशीर वारस म्हणून प्रतिवादी ७अ. श्रीमती लता मनोहर परब पुर्वाश्रमीची सुमती जगन्नाथ बांदिवडेकर (मुलगी) हेच वादीच्या म्हणण्याप्रमाणे कायदेशीर वारस आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *"दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते."*

०४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. ७ लक्ष्मी जगन्नाथ बांदिवडेकर या दिनांक ०८/१०/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीमध्ये वादीचा १/४ हिस्सा आहे असा ठराव होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी आणि प्रतिवादी नं. ७ व ८ यांच्या पुर्वाधिका–यांनी, प्रतिवादी नं. १ ते ५ यांच्या पुर्वाधिका–यांना लिहून दिलेले खरेदीखत निम्म्या हिश्शापुरते रद्द होऊन मिळणेसाठी व तत्परिणामी कायमच्या ताकिदीसाठी दाखल केला असल्याने प्रतिवादी नं. ७ चे कायदेशीर वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं. ७ चे कायदेशीर वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी नं. ७ विरुध्द 'दावा उपशमित' झालेबाबतचा आदेश नि. २५ कडील आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. नि. २६ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी नं. ७ चे कायदेशीर वारस अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

PAWAN RAMBHAU DHORE

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.03.21 15:57:59 +0530

दिनांक– २०/०३/२०२४ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.